# साद प्रतिसाद

July | Year 2024-25

Volume No. 1

www.rcsrpune.com

Club No. 52116
District: 3131


# ROTARY CLUB OF PUNE SINHAGAD ROAD

Rotary

## >>> E-BULLETIN 2024-25 <<<

THE MAGIC OF ROTARY



**Abhay Devare**

President



**Avanti Devare**

First Lady

## Bulletin Committee



**Rtn. Alka Deshpande**

Editor



**Rtn. Arati Bhat**

Co-Editor

## Committee Members



**Rtn. Sonali Acharya**



**Rtn. Ravi Ranjekar**



**Ann Neha Chavare**

## संपादकीय,

**नूतन रोटरी वर्षात सर्व रोटरी परिवाराचे हार्दिक स्वागत!**



नुकतीच उन्हाची काहिली दूर झाली आहे. मृग नक्षत्रात बरसलेल्या हलक्या सरींनी संपूर्ण आसमंत गंधित झाला आहे. दरवर्षी अशा, गंधाळलेल्या वातावरणात, आर्द्रा नक्षत्रात पेरणीचा हंगाम पूर्ण वेगात येतो. धरतीवर सर्वत्र हिरवीगार तृणांकुर दिसू लागतात.

घाटमाथ्यावर पसरलेल्या हिरव्यागार गालिच्याने निसर्गाप्रमाणेच आपल्याही तनामनावरील मरगळ, रखरखीतपणा नाहीसा होऊन वातावरणात एक ताजेपणा, टवटवीतपणा संचारतो. नवतीचाच मौसम असतो, हरित तृणांची मखमाली चादर नजरेला आल्हादपणा देते.

बदल हा निसर्गाचा स्थायीभाव आहे. ऋतू बदलतात, जुनी पाने गळून पडतात, वृक्षांना नवीन पालवी फुटते. हे जसे अटळ असते अगदी तसेच बदल जून, जुलै या महिन्यांमध्ये होतात.


नवीन तृणांकूर घाटमाथ्यावर दिसायला लागतात तसेच रोटरीमध्ये सुद्धा नवीन नेतृत्व उदयाला येते. पदग्रहणाचे उत्स्फूर्त कार्यक्रम सर्वच रोटरी क्लब मध्ये धुमधडाक्यात चालू होतात. रोटरीचे अव्याहत फिरणारे चाक अधिक गतिमान होऊन उत्साहाने कामाला लागते.

पेरलेलं मनासारखं उगवलं की कष्टकऱ्याला अधिक काम करायला बळ आणि ऊर्जा मिळते. तसेच रोटरीत तन,मन,धन लावून काम केले की, रोटरीचा वसा  घेतलेल्यांना नेटाने काम करण्यासाठी अधिक बळ प्राप्त होते.

शेवटी पेरणी धान्याची असो वा कर्माची, त्यातून होणारी फलप्राप्ती माणसाला समाधानी आणि कृतार्थ बनवते.

या येणाऱ्या नवीन वर्षात रोटरीत एकत्रितपणाचा आनंद घेत घेत सामाजिक बांधिलकी जपुया. सर्वांना खूप खूप शुभेच्छा !

**- रो. सौ. अलका देशपांडे**



# RI Director Message



**Dear fellow Rotary leaders,**

As we begin a new year of service, let us not forget the importance of every one of Rotary's members. We need your leadership now more than ever if we are to make every club and district an irresistible if we are to make every club and district an irresistible experience.

Rotary has a chance to capture the world's attention and realize possibilities beyond our expectations. But we must build on the work that has come before us if we are to reach our goals, such as defeating polio and unlocking the power of girls and women. Rotary offers people of action a chance to connect and find belonging, and this fellowship gives us the potential to improve our communities and the world. By following Rotary's Action Plan and helping make sure all members feel a sense of belonging in their club, you have a special opportunity to inspire members to new heights of service.

Our ability to create lasting change begins with our family of Rotary. Together, it is within our power to bring healing in a divided world.

Join me in making Rotary a source of strength for those who need it most, within and beyond our membership. Let this be the year we harness The Magic of Rotary, and let Rotary be known as an organization that takes care of its members as well as the people we serve. It is within your power to help make Rotary a beacon of goodwill and fellowship in every community. Remember that your work can and will change the world with The Magic of Rotary.

Warm regards,



**Stephanie A. Urchick**
Rotary International President,
RIY 2024-2025

# DG Rtn Shital Shah's Message



**My dear Fellow Rotarians,**

As the new Rotary year 2024-25 sets in, the magical journey of District 3131 begins with "ROTARY CHATRA CHAYA" project - an initiative that will go a long way in engaging members & enhance the public image of Rotary by providing shelter to poor street vendors.

I appreciate all Rotary Clubs for overwhelming response to this unique project. District 3131 is on the rise & our journey has been progressive & impressive year after another. We have set high benchmark to our Foundation givings & to the quantum of service projects we undertake in all 7 Focus areas. Participation of clubs in youth activities & structured programs has been fabulous. Our reach out to corporate for taping CSR funds for Rotary projects has been phenomenal. As we move ahead, let us all strive to achieve new milestones for 3131.
RI President Stephanie Urchick has unveiled the theme for RY 24-25 "The Magic of Rotary ".
It is the magic when we Rotarian's transform lives by providing education to illiterates, change lives when we provide pure drinking water, develop villages and eradicate dreadful diseases like polio. As a true Rotarian, responsibility lies upon us to continue our service for the deprived communities.
We have thoughtfully launched the Playing 11 initiative under District 3131 thrust area. Activities & projects listed in Playing 11 will create huge impact on communities in every corner of our District . The CHAUKAR & SHATKAR initiatives are well informed in District forums and I expect each and every club participate in this super initiative.
Rotary action plan begins with membership. Adding new members and engaging them in Rotary projects will make our clubs vibrant. Be sure that the member experience matters the most in retaining them.
In the end let me touch upon 4 pillars that will bring the magic of Rotary :- 1) Bringing Youth to Rotary 2) Getting Women in Rotary 3) Tap CSR funds by reaching out to corporate world & 4) Your wholehearted donation to Rotary Foundation.
Wish you all the best for the rocking and the most happening RY 2024-25 !!!

TOP REGARDS & TRULY YIR,

**Rtn Shital Shah**
District Governor,
RID 3131

# President Message



**नमस्कार**

आपल्या क्लबच्या सर्व सभासदांना नवीन रोटरी वर्ष २०२४-२५ साठी शुभेच्छा !

नवं वर्ष, नवा अध्यक्ष, नवी डायरेक्टर बॉडी प्रत्येक वर्षी काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करीत असते, तसाच माझाही प्रयत्न आहे. मात्र त्यासाठी आपल्या सर्वांची साथ मिळेल अशी अपेक्षा आहे.

या वर्षी डिस्ट्रिक्ट ३१३१ ची क्रिकेट ही थीम आहे. वेगवेगळ्या प्रोजेक्ट साठी "Playing 11" मध्ये वेगवेगळे ११ रेडीमेड प्रोजेक्ट्स आहेत. त्यामध्ये प्रत्येक क्लब भाग घेईल त्याप्रमाणे चौकार, षटकार, अष्टकार व प्लेयिंग एलेवन असे वेगवेगळे स्पर्धात्मक पुरस्कार आहेत. त्यामध्ये प्लेयींग एलेवन मध्ये सर्व प्रोजेक्टमध्ये भाग घ्यायचा माझा विचार आहे, मात्र त्यासाठी तुम्हा सर्वांची साथ मात्र आवश्यक आहे. यामध्ये पारितोषिक मिळविणे हा उद्देश नसून सर्वांबरोबर आपणही त्यात सहभागी होवून अनेक गरजू लोकांपर्यंत पोचून त्यांना अपेक्षित ती मदत करायचा मानस आहे. कोणतेही उद्दिष्ट पूर्ण करायचे म्हटले की टीम वर्क आवश्यक आहे. कुणीही एकटा ते उद्दिष्ट पूर्ण करू शकत नाही. त्यासाठी तुम्ही सर्वजण मला सर्वतोपरी साथ द्याल अशी अपेक्षा आहे.

त्याचबरोबर आपले पारंपारिक असे जे प्रोजेक्ट्स आहेत तेही आपण चालूच ठेवणार आहोत. त्यासाठी दीपक, मिलिंद व अमोल यांची CSR साठी अनमोल मदत ही मिळेलच.

यावर्षी आपण सतीशच्या डिजिटल वॉटर मॅनेजमेंट या सिनर्जी प्रोजेक्ट मध्ये सहभागी होत आहोत.

यावर्षी एक/दोन Innovative Projects, Global Grant करण्याचा प्रयत्न आहे, त्यावर काम चालू आहे. त्यात यश आले तर योग्यवेळी त्याची घोषणा मी करीनच.

यावर्षी आपण प्रत्येकाला त्याचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस व फाउंडेशन डोनेशन यासाठी वेगळ्या व आकर्षक अशा फ्लायरने सन्मानित / प्रोत्साहित करणार आहोत.

तसेच यावर्षी सोशल मीडियाचा वापर आपण प्रभावीपणे करणार आहोत. फेसबुक, वेबसाईट, Instagram, LinkedIn वर आपली पब्लिक इमेज आपण प्रभावीपणे वाढविणार आहोत.

आपले क्लब सदस्य अधिक आनंदी व एकत्रित राहावेत यासाठी दर शुक्रवारी वेगवेगळे कार्यक्रम तर असतीलच पण दर तिमाही मध्ये आपल्या क्लब सदस्यांचा सहभाग असणारा एक हटके कार्यक्रम मी आयोजित करणार आहे. त्याचप्रमाणे आपली पिकनिक, ३-४ वेगळ्या आऊटडोअर मीटिंग, वोकेकशनल टूर देखील मी प्लॅन केल्या आहेत.

वेगवेगळ्या क्लबच्या रोटेरियनची ओळख व्हावी या उद्देशाने आपण काही मीटिंग या जॉइंट मीटिंग व काही सिनर्जी मीटिंग घेणार आहोत.

दर महिन्यात चारी शुक्रवारी आपली साप्ताहिक सभा असेल व पाचव्या शुक्रवारी आपण शुक्रांगण मध्ये सहभागी होणार आहोत. साप्ताहिक सभेमध्ये सभासदांचा वैयक्तिक सहभाग वाढविण्यावर माझा भर असेल.

आपले Rotaract / Interact Club कसे active राहतील यासाठी माझा प्रयत्न असेल. आपली होतले येथील RCC व आपण एक नवी RCC करत आहोत, तिथे वेगवेगळे उपक्रम घ्यायचा विचार आहे.

आपल्या क्लबला आता २५ वर्ष पूर्ण झाली आहेत. आपला क्लब आता प्रगल्भ झाला आहे. तेव्हा आपल्या क्लबची वाटचाल ही अधिक दैदिप्यमान करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. कारण गेल्या २५ प्रेसिडेंटनी आपला क्लब एका वेगळ्या उंचीवर नेवून ठेवला आहे.

तेव्हा हा जगन्नाथाचा रथ आपल्या सर्वांच्या सहकार्याने पुढे वाटचाल करणार आहे. त्यासाठी माझा प्रयत्न व आपण सर्वांची साथ आवश्यक आहे.

**अभय देवरे**

अध्यक्ष,

रोटरी वर्ष २०२४-२५

# First Lady Message



**नमस्कार 🙏**

मित्र/ मैत्रिणींनो,
आपल्या क्लब मध्ये First Lady म्हणुन काम करण्याची संधी मला मिळाली आहे, हा मी माझा बहुमान समजते.

**उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।**

म्हणजे कोणतेही काम करण्यासाठी सतत कार्यरत राहणे आवश्यक असते आणि अर्थातच त्यासाठी सर्वांची साथ खुप मोलाची असते. या वर्षात मला व अभयला रोटरीच्या वेगवेगळ्या कामासाठी सतत कार्यरत राहावे लागणार आहे, त्यासाठी तुमची साथ ही आम्हाला खूप मोलाची आहे.

आपल्या Anns Group वरील तुम्हा मैत्रीणीच्या सहाय्याने आपण आपला क्लब आणखीन उंचीवर नेण्याचा प्रयत्न करुयात.
नवीन नवीन Activities करून आनंद मिळवुयात .

माझ्या या प्रवासात आपणा सर्वांचे सहकार्य मला नक्की मिळेल याची खात्री आहे.

**अवंती देवरे**
First Lady

## Maternal and Child Health Month - July



Rotary makes high-quality health care available to vulnerable mothers and children so they can live longer and grow stronger.... We expand access to quality care, so mothers and children everywhere can have the same opportunities for a healthy future...

An estimated 5.9 million children under the age of five die each year because of malnutrition, inadequate health care, and poor sanitation — all of which can be prevented.....
July is Maternal and Child Health Month - Every day mothers risk their lives giving birth and millions of children die each year from treatable, preventable causes... At least 7 million children under the age of five die each year due to malnutrition, poor health care, and inadequate sanitation.... To help reduce this rate, we provide immunizations and antibiotics to babies, improve access to essential medical services, and support trained health care providers for mothers and their children..... Rotary projects ensure sustainability by empowering the local community to take ownership of health care training programs... Rotary provides education, immunizations, birth kits, and mobile health clinics..... Women are taught how to prevent mother-to-infant HIV transmission, how to breast-feed, and how to protect themselves and their children from disease......

# माझ्या आयुष्यातील चमत्कार



आपल्याला ज्या गोष्टींची शक्यता वाटत नाही,अशा गोष्टी घडणं यालाच तर चमत्कार म्हणतात. मी सातारा जिल्ह्यातील लहानपणापासून च मला कायम पुण्याचं आकर्षण. खुप ईच्छा पुण्याची, पण कसं शक्य होणार. मला नोकरी लागली. सातारा हेडक्वार्टर. पण सातारला आफीस नव्हते म्हणून पुण्यात यायला लागले. पावर ऑफ स्पोकन वर्डस् हा एक चमत्कार. पण हे तात्पुरते होते. आम्ही सगळा स्टाफ आम्ही चहासाठी जवळच्या हॉटेल मधे जायचो, शेजारी पोलीस कमिशनर चे आफीस होते ते पण तिथेच यायचे चहाला.

तिथे बापूंची नजर माझ्यावर पडली, अन् ते माझ्या प्रेमात पडले हा पण एक चमत्कार. अन् मी पुणेकर झाले. पुण्यात मी गाडी शिकले.
आफीस मधील मैत्रीणी पुणेकर असुनही त्यांच्याशी माझी छान गट्टी जमली. मी गावाकडची असल्याने माझी भाषा येकी, जाकी अशी अन् पुणेकरांची येना, जाना. माझ्या भाषेत जरब पुण्याची भाषा मवाळ. पण ह्या मुळे मैत्रित काही फरक पडला नाही. माझी आई नेहमी म्हणायची जे वाटतं ते बोलून मोकळे व्हावे, भिजत घोंगडे ठेवू नये. मी तेचं करते. लोकांना तो आगाऊपणा वाटतो. तर माझा स्वभाव आगाऊचं म्हणा. आणि ती म्हणायची माणसात देव बघावा, भुकेल्या ची भुक जाणावी. त्यामुळे फार देव देव मला जमले नाही. माझया मैत्रिणी स्वामी भक्त असल्याने कर्दळीवन परिक्रमा करण्याचे ठरले. हो नाही करत मी ही फार्म भरला ज्या फार्म मधे असे लिहिले होते की वाटेत जर काही बरे वाईट झाले तर ह्या ला आयोजक जबाबदार नाहीत. पण सुखरूप पोचलो. पूणे ते हैदराबाद, हैदराबाद ते श्रीशैल्यम. श्रीशैलम ते कर्दळीवन बोटीतून दीड तासाचा पाताळगंगा नदीचा प्रवास. अथांग नदी. तिचे पात्र प्रचंड मोठे धडकी भरणारे. पण स्वामींच्या गजरात पार केली नदी, अन् सुरू झाला खडतर प्रवास. विशवास बसणार नाही इतकी भयानक शांतता. आम्ही सोडून चिटपाखरूही नव्हते. फक्त घनदाट जंगल. रहायला गुंफा. निरमनुष्य शब्द ऐकला होता तो आम्ही अनुभवत होतो. मी तर जेवणं केले नाही कारण तिथे वाशरूम नव्हते. सकाळच्या विधींना उघड्यावर जावे लागते तेही मिळून कारण तिथे अस्वले आहेत ते माणसांना नेतात हे सांगितले होते. गुंफेतुन वर यावे लागे शिशू साठी. मी ना पाणी प्या ले ना जेवले. तीन दिवस ४० किमी चा चढून ऊतरण्याचा खडतर प्रवास. आता ही परिक्रमा बंद झालीय कारण अति शहाण्या माणसाने तिथेही निसर्गा वर अतिक्रमण केले. ध्यानीमनी नसताना माझ्या कडून ही परिक्रमा घडवून घेतली स्वामी नी .हा एक चमत्कार.
पुढे जाऊन गिरनार परिक्रमा पण केली. ही पण स्वामींच्या कृपेनं पार पडली. १०,००० पायऱ्या चढून तेवढ्याच उतरणे. फार चढण, हातात आधारा साठी काठी, लाईट नाही. पण तेही स्वामी नी करून घेतले. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे असे न म्हणता ते माझ्या सोबतचं होते. अशक्य ते शक्य करतील स्वामी मी हे अनुभवले. हा पण चमत्कार चं.

असे खुप चमत्कार आहेत लिहू पुढे मागे.

आता मुख्य चमत्कार.मी रोटरी ची अध्यक्ष झाले, ऐन पंचवीशीतला क्लब मला त्याचे नेतृत्व करायला मिळाले,हा केवढा मोठा चमत्कार.मी विचार पण केला नव्हता.पण मित्र, मैत्रिणी नो मी न मागता एवढा मोठा परिवार लाभणं चेष्टा नाही.तुम्ही सगळ्यांनी मला समजून घेतले.त्यासाठी मी तुमच्या ऋणांतच राहू इच्छिते.
तुमच्या मुळे माझे रोटरी वर्ष फार मजेत पार पडले.अशीच अखंड नाती राहोत हीच स्वामी चरणी प्रार्थना.
धन्यवाद.👏

**- सौ. लता शिंदे**

# Directors of RCPSR



**ABHAY DEVARE**
President



**RAVI RANJEKAR**
Vice President



**ANURADHA KALE**
Secretary



**SIDDHARTH SHETYE**
Joint Secretary



**NAGESH SALGARE**
Treasurer



**SATISH KULKARNI**
Club Admin Director



**AMEY PASALKAR**
Service Director



**MANOJ DESHPANDE**
Service Director (Medical)



**TUSHAR ACHARYA**
Foundation Director



**SUNIL JADHAV**
Membership Director



**PRAKASH VASEKAR**
Environment Director



**SUMEDHA PATANKAR**
IT and International Service Director



**BALIRAM MUTGEKAR**
Vocational Director



**NITIN CHAWARE**
Youth Director



**SANGEETA PIMPLIKAR**
Sports Director



**MILIND BIWALKAR**
Director Public Image



**SHARAD LAGU**
Seargent at Arms



**VINAYAK GAIKWAD**
Internal Auditor



**ASHOK BHANDARI**
Club Facilitator



**LATA SHINDE**
Immediate Past President



**AMEY PASALKAR**
President Elect (2025-26)



**NAGESH SALGARE**
President Nominee (2026-27)

# District Officers RIY 2024-25



**SATISH KHADE**
Mentor
(Wash & Wins)



**DEEPAK MAHAJAN**
Mentor (CSR)



**SUDHEER DAFTARDAR**
Co-Director (CSR)



**DNYANDEY GHORPADE**
Co-Director
(Economic & Community Developement)




**ASHOK BHANDARI**
Chairperson
(RYE)



**MRINMAYI PASALKAR**
Co-Chair (YOUTH)



**NITIN CHAWARE**
Co-Chairperson
(RYE)



**HARSHVARDHAN BHUSARI**
RYLA Co-Chair
(YOUTH)



**AMOL KAGAWADE**
Zone 5 Chair (CSR)



**ANURADHA KALE**
Zone 3 Chair
(WASH)



**SUNIL JADHAV**
Zone 5 Chair
(TRF PROMOTION)



**ABHAY MAYADEO**
Zone 5 Chair
(HAPPY VILLAGE)

# विठू माझा सावळा



आरती भट

विठू माझा सावळा
आहे पंढरीचा राया
रंग त्याचा वेगळा
त्याची रखूमाई छाया

भाळी शोभे टिळा
हार तुळशीचा गळा
कटी पिवळा पीतांबर
हरी नामाचा गजर

गजर घुमतो त्रिभुवनी
टाळ चिपळ्यांचा ध्वनी
नाचती अवघे वैष्णवजन
चाले कीर्तन भजन


पंढरीची करीता वारी
भक्तिभाव दाटे उरी
पंढरीनाथा दे एकची दान
ओठी राहो सदा तुझे नाम

विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल

- आरती भट

# गात चालती अभंग....

**आषाढ आला की विठ्ठल भक्तांचे लक्ष लागते ते पंढरपूरच्या यात्रेकडे.आषाढी एकादशीला त्या विठ्ठलाची उरा उरी भेट घेणे हे एकमेव ध्येय राहते,मग विठू नामाच्या गजरात पाऊले पंढरीची वाट चालू लागतात आणि एका चैतन्य सोहळ्याचे विराट दर्शन होते.**



**रवी रांजेकर**

आषाढीच्या वारीमध्ये
नित्य लाभतो सुसंग
आस लागलिया त्याची
गात चालती अभंग

आया बाया माय लेकी
अन बापे गडी रे उदंड
माळकरी टाळकरी
गात चालती अभंग

कोणा डोई वृंदावन
ध्वजा पताकाची संग
मुखी घेत हरी नाम
गात चालती अभंग

टाळ चिपळी ती वाजे
साथ देई तो मृदूंग
कोणा कोणा संतांचे ते
गात चालती अभंग

चित्त तेथे होई लीन
मनी भक्तीचे उमंग
भारावली पाऊले ती
गात चालती अभंग

ऊन भासते चांदणे
पाऊसही नाचे संग
होई उल्हासित मन
गात चालती अभंग

रिंगणे ती होता सारी
सारे भेटाभेटी दंग
भेटण्यास त्याला सारे
गात चालती अभंग

वेस पंढरीची आली
पाणी चंद्रभागे उदंड
वेग पाऊलाचा वाढे
गात चालती अभंग

भेटला रे सखा माझा
खरा लाभला आनंद
नेत्री रूप साठविता
विसरला हो अभंग

नेत्री रूप साठविता
विसरला हो अभंग.....

**- रवी रांजेकर**

# Awards of 2023-24

RCPSR Club Awards - Function 28/6/2024 at Dakkhan Banquet Hall




## CERTIFICATE OF APPRECIATION

| | | |
|---|---|---|
| 1. Best assimilation in the club | - | **Rtn. Sharad Lagu and Rtn. R. D. Jadhav** |
| 2. Best support for CSR Projects /Audits | - | **Rtn. Jitendra Rander** |
| 3. Best Project- Anaemia test (VITESCO) | - | **Rtn. Milind Biwalkar** |
| 4. Best committee in club service (Fellowship) | - | **Rtn. Sumedha Patankar** |
| 5. Signature performer of Club | - | **Rtn. Sudhir Daftardar and Rtn. Satish Khade** |
| 6. Best Support for organizing Monsoon Picnic | - | **Ann Arpita Choulwar** |

## AWARDS OF 2023-24

| | | |
|---|---|---|
| 1. Best Ann of the year | - | **Ann Neha Chaware** |
| 2. Maximum attendance by Ann/Anna | - | **Ann Neha Chaware** |
| 3. Maximum attendance by Rotarian | - | **Rtn. Satish Kulkarni** |

# AWARDS OF 2023-24

| | | |
|---|---|---|
| 4. Best Annet | - | **Rtn. Renuka Pandit and Rtn. Ojas Arvikar** |
| 5. Maximum no. of projects under any avenue (Medical) | - | **Rtn. Anita Pandit** |
| 6. Best Project in community service | - | **Rtn. Ashok Bhandari and Rtn. Abhay Mayadeo** |
| 7. Outstanding partner in service project - ZS India | - | **Rtn. Deepak Mahajan** |
| 8. Maximum attendance in service project | - | **Rtn. Renuka Ingale and Rtn. Rekha Gaikwad** |
| 9. Best support in Youth Service | - | **Rtn. Sunil Pimplikar** |
| 10. Best guardian of the month | - | **Rtn. Sneha and Rtn. Sunil Jadhav** |
| 11. Best Director - Membership Avenue | - | **Rtn. Bhavana Daftardar** |
| 12. Best Performance by Club Director | - | **Rtn. Manisha Adhikari and Rtn. Swati Ranjekar** |
| 13. Best participation in club projects | - | **Nitin Chaware** |
| 14. Best Rotary family | - | **Dr. Manoj and Dr. Aparna Deshpande** |
| 15. Best couple of the year | - | **Rtn. Anuradha and Rtn. Girish** |
| 16. Best Rotarian | - | **Rtn. Abhay Mayadeo** |
| 17. Unique personality of the year | - | **Rtn. Deva Ghorpade** |
| 18. Best Participation by new member | - | **Rtn. Arati Bhat** |
| 19. Best Ambassador | - | **Rtn. Tushar and Rtn. Sonali Acharya** |

**Rtn. Lata Shinde**
**President**

**Rtn. Abhay Devare**
**Secretary**

# Programs in the Month of July

## Maternal & Child Health Month

| Date | Program |
| --- | --- |
| 09 July | अध्यक्ष आणि बोर्ड ऑफ डायरेक्टर स्थापना कार्यक्रम (INSTALLATION PROGRAM) - राजलक्ष्मी सभागृह |
| 21 July | मंजुषा पाटील यांचा अभंगवाणी कार्यक्रम - सिनर्जी मीटिंग |
| 26 July | एडव्होकेट शैलेंद्र देशपांडे यांचे इच्छापत्र (WILL) वरील व्याख्यान |

# रोटरी इंटरनॅशनल कन्व्हेन्शन - सिंगापूर २०२४
## रोटरीची पंढरी




**रोटरी इंटरनॅशनल कन्व्हेंशन** म्हणजे जशी पंढरपूरची आषाढी यात्रा !! एका समान सूत्रात बांधलेले जगभरातील रोटरी गण त्यांचे त्यांच्या देशाच्या पताका घेऊन अशा वार्षिक सोहळ्यात सहभागी होतात. धर्म- देश -पंथ -लिंग -वय इत्यादी भेदांना बाजूला सारून सर्व service above self या एकाच ध्येयाने एकत्रित झालेले 15 ते 20 हजार रंगीबिरंगी स्मार्ट सुंदर पब्लिक पाहून वेगळ्याच दुनियेत आल्या सारखे वाटते . मला सर्वात आवडलेली बाब म्हणजे तुम्ही कोणाबरोबरही स्माईल करून शेक हैंड करून त्यांच्याबरोबर लगेच बोलायला चालू करू शकता !! जसे वारकऱ्यास पंढरपूरला दरवर्षी जावे वाटते, तसेच मलाही दरवर्षी कन्व्हेंशनला न चुकता जावे वाटते असाच माझा एक अनुभव म्हणजे सिंगापूरचे मागील वर्षीचे रोटरी कन्व्हेन्शन...



यात अगदी आनंदाची बाब म्हणजे आपल्या क्लबमधूनच दरवर्षी जवळजवळ ७-८ रोटारियन्स जातातच , यंदाही मी , सुधीर-भावना, तुषार-सोनाली, सुनील-स्नेहा तसेच तुषार सोनाली चा मुलगा असे ८ जण सिंगापूर ला गेलो होतो. कनव्हेंशनच्या उद्घाटनाच्या वेळी सर्व देशांच्या रोटरींची परेड होते . दरवर्षीप्रमाणे हा कार्यक्रम डोळ्याचे पारणे फेडणारा असा असतो. तसेच फ्रेंडशिप हाऊस हा सर्वात महत्त्वाचा उपक्रम आहे.

एक मोठ्या विस्तीर्ण जागेमध्ये जगभरातील रोटेरियन्स वेगवेगळे स्टॉल्स लावतात यामध्ये रोटरीच्या सर्व एवेन्यूज चे उत्कृष्ट दर्शन होते, एवढेच नाही तर एका कॉमन परफॉर्मन्स प्लॅटफॉर्मवर देशोदेशीची रोटेरियन्स वय विसरून स्वयंस्पुरतेने त्यांच्या त्यांच्या देशाची म्युझिक लावून नवरंगी पोषाखात नृत्यही करतात हा मनमोहक सोहळा भरपूर गर्दी खेचणार असतो.

तुम्ही अगदी कोणाबरोबरही फोटो , व्हिडीओ काढू शकता आणि आपला गोड आठवणीचा छान अल्बम तयार करू शकता. थोडक्यात अशी रोटरी पंढरीची ची संधी जरूर साधा, नाहीतर “वारकरी व्हायचं न पंढरपूरला आयुष्यात जायचं नाही” असं व्हायला नको !!!
त्यामुळे पुढील कन्वेंशन जे कॅनडाला जुनमधे आहे त्याची संपूर्ण माहिती घेण्यासाठी **rotary.org** ला किंवा मला भेटा !!!😜

**- Rtn Ashok Bhandari**

# धन्यवाद...